जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

पुणे पोलीस
Pune Police

स्वस्ति श्रीराज्याभिषेक शके ३५०

## प्रेसनोट क्रमांक - २२१ दिनांक - २४/०४/२०२४

भारती विद्यापीठ पोलीस स्टेशन,पुणे शहर

### मकोका गुन्हयामध्ये दीड वर्षापासुन फरार असलेल्या आरोपीस केली अटक.

भारती विद्यापीठ पोलीस स्टेशन,पुणे गुन्हा रजि नंबर ११९/२०२३ भा.द.वि कलम ३०७,३२३,१४३, १४४,१४७,१४८,१४९ आर्म ॲक्ट ४(२५),महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ३७(१)(३)सह १३५ महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण कायदा कलम ३(१)(ii),३(२),३(४) या गुन्हयातील मागील एक वर्षापासुन पाहीजे असलेला आरोपी **अजित ऊर्फ जोजो जगदीश शेट्टी, वय २३ वर्षे, रा. राजे चौक, रिगल बेकरी जवळ, चव्हाण कॉम्पलेक्स शेजारील बैठेचाळीमध्ये,मोहननगर,पुणे** हा गुन्हा दाखल झाल्यापासुन मिळुन येत नव्हता.

आरोपी **अजित ऊर्फ जोजो जगदीश शेट्टी, वय २३ वर्षे, रा. राजे चौक, रिगल बेकरी जवळ, चव्हाण कॉम्पलेक्स शेजारील बैठेचाळीमध्ये,मोहननगर,पुणे** याचा भारती विद्यापीठ पोलीस स्टेशनकडील तपास पथकाचे अधिकारी व अंमलदार गुप्त बातमीदारांचे नेटवर्क सक्रीय करुन व तांत्रिक विश्लेषणावरुन शोध घेत असताना पोलीस अंमलदार **धनाजी धोत्रे, सतिश मोरे, सचिन गाडे** यांना नमुद आरोपी हा वारजे पोस्ट ऑफिस जवळ असल्याची खात्रीलायक बातमी मिळाल्याने लागलीच तपास पथकाचे अधिकारी व अंमलदार यांनी सदर ठिकाणी जावुन आरोपीताचा शोध घेतला तो मिळुन आल्याने त्यास ताब्यात घेवुन पुढील कारवाई कामी गुन्हयाचे तपासी अधिकारी सहाय्यक पोलीस आयुक्त, स्वारगेट विभाग, पुणे श्रीमती नंदीनी वग्याणी यांचे ताब्यात देण्यात आले असुन त्यांनी सदर आरोपीतांना नमुद गुन्हयामध्ये अटक केली आहे.

सदरची कामगिरी मा.पोलीस उप आयुक्त परिमंडळ २ श्रीमती स्मार्तना पाटील, मा.सहा. पोलीस आयुक्त स्वारगेट विभाग,श्रीमती नंदीनी वग्याणी यांचे मार्गदर्शनाखाली भारती विदयापीठ पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री डी.एस.पाटील, पोलीस निरीक्षक (गुन्हे) श्री.शरद झिने, तपास पथकाचे अधिकारी सहा.पोलीस निरीक्षक समीर कदम, पोलीस उप निरीक्षक धिरज गुप्ता, पोलीस अंमलदार धनाजी धोत्रे, सचिन गाडे, सतिश मोरे, सचिन सरपाले, शैलेश साठे, नामदेव रेणुसे, चेतन गोरे, महेश बारवकर, निलेश जमदाडे, निलेश ढमढेरे, हनमंत मासाळ, मंगेश पवार, हर्षल शिंदे, अवधतु जमदाडे, निलेश खैरमोडे, अभिनय चौधरी, विक्रम सावंत, राहुल तांबे, यांच्या पथकाने केली आहे.